# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**
☎ २५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी /२०१९/ 5372 दिनांक : 21 DEC 2019

प्रति
संचालक / प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायीक
अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसाईक अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या पडताळणीबाबत....

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/प्र.या पडताळणी/२०१९/७१५ दिनांक ०९/०९/२०१९.
२. या कार्यालायचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी/२०१९/४७०० दिनांक १६/११/२०१९.
३. मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/परिपत्रक/८२७ दिनांक ०७/११/२०१०.
४. या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रीया २०१९-२०/५०१२ दिनांक ०४/१२/२०१९

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्तायादीची पडताळणी **Safalta** वेब पोर्टलव्दारे या कार्यालयाकडून तसेच उपकेंद्राकडून करण्यात आलेली आहे. सदर पडताळणीचे काम अंतिम टप्यात आले असून संस्थांची गुणवत्तायादी पडताळणी केल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मंजूरीची स्थिती संस्थेच्या लॉगिन मध्ये उपलब्ध आहे. या मध्ये प्रवेश मंजूर केलेल्या तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या त्रुटी प्रलंबीत आहेत अशा विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध आहे.

या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संस्थेच्या लॉगिन मधून आपल्या संस्थेतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश मंजूरीबाबत **Safalta** वेबपोर्टलवर तपासणी करावी व याबाबत काही तफावत आढळून आल्यास तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या त्रुटींचे निराकरण झालेले आहे परंतू सदर त्रुटी **Safalta** वेबपोर्टलवर प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे अशा प्रकरणी संस्थांच्या प्रतिनिधींनी **Safalta** पोर्टलवर आवश्यक सर्व कागदपत्रे अपलोड करुन त्रुटीपुर्तता कागदपत्रांसह तात्काळ या कार्यालयामध्ये उपस्थित रहावे.

सदरचे काम कालमर्यादेचे असल्याने याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी.

प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.